18 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुण्यनगरी

# विद्यापीठात बनविली इलेक्ट्रिक बाईक

## तंत्रज्ञान विभागातील विद्यार्थ्यांनी शोधला प्रदूषण, वाहतूक समस्येवर उपाय

**कोल्हापूर / वैभव गोंधळी**

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील यांत्रिकी-अभियांत्रिकी पदवीच्या चौथ्या वर्षातील विद्यार्थ्यांनी फोल्डेबल इलेक्ट्रिक टू व्हीलर बनविली आहे. या बाईकला जे.ओ.एस.टी. १६ असे नाव देण्यात आले आहे. शुभम साळुंखे, ओंकार भंडारे, जॅकी गुरव व तुषार भोसले यांनी ही बाईक तयार केली आहे.

अनेक प्रकारच्या प्रदूषणामध्ये सध्या वाढ होत असल्यामुळे जागतिक तापमानातही वाढ होत आहे. वायू प्रदूषण व ध्वनी प्रदूषणाने मानव जातीला ग्रासले आहे. सध्या विविध पातळ्यांवर या समस्येवर उपाय शोधण्याचे काम सुरू आहे. प्रदूषण टाळण्यासाठी कमी आवाज व कमी धूर सोडणाऱ्या गाड्या तयार करण्याकडे संशोधकांनी प्रयत्न चालविले आहेत. जगभरात इंधनाचा साठा मर्यादित आहे, तर इंधनाचे दर प्रतिदिन वाढत आहेत. त्यामुळे इंधनाचे नवनवीन स्रोत शोधले जात आहेत.

शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान विभागातील अभियांत्रिकीच्या चौथ्या वर्षासाठी इनोव्हेटिव्ह प्रोजेक्ट नावाचे एक प्रात्यक्षिक असते. यामध्ये जॅकी, ओंकार, शुभम आणि तुषार या विद्यार्थ्यांनी एक आगळीवेगळी गाडी तयार करायचे ठरविले आणि फोल्डेबल इलेक्ट्रिक टू व्हीलर तयार केली. या गाडीला 'जे.ओ.एस.टी. १६' असे नाव दिले आहे. नावामधील जे - म्हणजे जॅकी, ओ. म्हणजे ओंकार, एस. - शुभम, टी. तुषार असे संदर्भ आहेत. या गाडीचे फिचर जबरदस्त असे आहेत. ५० किलो वजनाची ही गाडी ताशी ३० ते ३५ किलोमीटर वेगाने ▶▶ पान २ वर

### समाजासाठी उपयोगी



विद्यार्थ्यांनी बनविलेली बाईक वाहतूक समस्या, इंधनाचे वाढते दर व अपघातांवर योग्य पर्याय आहे. उत्पादन मोठ्या प्रमाणात केल्यास खर्चात कपात होईल. कमी खर्चात व स्क्रॅप मटेरियलमध्ये तयार होणारी बाईक समाजोपयोगी ठरणार आहे. **-जयदीप बागी**, डायरेक्टर तंत्रज्ञान अधिविभाग



**'जे.ओ.एस.टी. १६' या फोल्डेबल इलेक्ट्रिक टू व्हीलससोबत तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थी व मार्गदर्शक.** (छाया : अमर कांबळे)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 JAN 2017
तरुण भारत

# बालवाडी शिक्षकांसाठी शनिवारी कथा, कविता लेखन शिबिर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील प्रौढ आणि निरंतर शिक्षण व विस्तार कार्य अधिविभागामार्फत २१ ते २२ जानेवारी या कालावधीत बालवाडी शिक्षिकांसाठी 'बालसाहित्य निर्मिती' शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम प्रौढ आणि निरंतर शिक्षण व विस्तार कार्य अधिविभागात होणार आहे. यामध्ये बाल कविता, बालकथा कशा लिहाव्यात याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. नाव नोंदणीसाठी अधिविभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. सुमन बुवा यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 JAN 2017
महाराष्ट्र टाईम्स

## डॉ. थोरात यांचे व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आणि शहाजी लॉ कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने 'प्रिन्सिपल एस. व्ही. आपटे व्याख्यानमाला' अतंर्गत डॉ. वाय. एस. पी. थोरात यांचे बुधवारी (ता. १८) शहाजी लॉ कॉलेज येथे व्याख्यान होणार आहे. 'भारतीय लोकशाहीवरचे संकट' या विषयावर सकाळी साडे नऊ वाजता डॉ. थोरात मार्गदर्शन करणार आहेत. व्याख्यानमालेचे अध्यक्षस्थान रजनीताई मगदूम भूषवणार आहेत. व्याख्यानमालेस उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. आर. नारायण व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 JAN 2017
पुढारी

# विद्यापीठात राष्ट्रमाता जिजाऊ यांना अभिवादन

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठात राष्ट्रमाता जिजाऊ यांची जयंती साजरी करण्यात आली. बीसीयूडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांच्या हस्ते राष्ट्रमाता जिजाऊंच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. पद्मजा पाटील, डॉ. एन. डी. पारेकर, डॉ. अवनिश पाटील, प्रा. अविनाश भाले, डॉ. नीलांबरी जगताप, उमेश भोसले, प्रा. धीरज शिंदे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 JAN 2017
तरुण भारत

# 'कॅशलेस महाराष्ट्र' वर आज कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ, अनुगामी लोकराज्य महाभियान आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने येथील महावीर महाविद्यालयामध्ये आज 'कॅशलेस महाराष्ट्र' ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. सकाळी ८.३० वाजता या कार्यशाळेस प्रारंभ होणार आहे. आचार्य विद्यानंद संस्कृती भवन येथे 'वित्तीय साक्षरता अभियान व कॅशलेस महाराष्ट्र' या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. चार्टर्ड अकौंटंट श्रीकांत बच्चे, तसेच महाराष्ट्र बँकेचे तज्ज्ञ अधिकारी मार्गदर्शन करणार आहेत. शहरातील सर्व महाविद्यालयातून एक प्राध्यापक व ५ विद्यार्थी–विद्यार्थिनींना या कार्यशाळेस पाठवावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 JAN 2017
तरुण भारत

# विद्यापीठातर्फे रविवारी पत्रकारिता कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासन आणि दिगंबर जैन बोर्डिंग यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार २२ जानेवारी रोजी 'पत्रकारिता कार्यशाळे'चे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेचे उद्घाटन रविवारी सकाळी १० वाजता दिगंबर जैन बोर्डींगमध्ये 'तरुण भारत'चे निवासी संपादक जयसिंग पाटील यांच्या हस्ते होणार आहे. अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील अध्यक्षस्थान भूषवणार आहेत.

पहिल्या सत्रात 'जैन पत्रकारिता-नियतकालिके' या विषयावर ज्येष्ठ पत्रकार डॉ. महावीर अक्कोळे मार्गदर्शन करणार आहेत. प्राचार्य श्रीधर हेरवाडे अध्यक्षस्थान भूषवणार आहेत. दुसऱ्या सत्रात 'बदलती ग्रामीण पत्रकारिता' विषयावर ज्येष्ठ पत्रकार विश्वास पाटील मार्गदर्शन करणार आहेत. भगवान महावीर अध्यासन केंद्राच्या समन्वयक डॉ. पद्मजा पाटील अध्यक्षस्थान भूषवणार आहेत. तिसऱ्या सत्रात 'वृत्त संकलन कसे करावे?' या विषयावर ज्येष्ठ पत्रकार गुरूबाळ माळी मार्गदर्शन करणार आहेत. ज्येष्ठ पत्रकार अनिल देशमुख अध्यक्षस्थान भूषवणार आहेत. समारोपप्रसंगी ज्येष्ठ पत्रकार 'प्रसार माध्यमांचे बदलते विश्व' या विषयावर मोहन हवालदार मार्गदर्शन करणार आहेत. दक्षिण भारत जैन सभा केंद्रीय उपाध्यक्ष प्रा. डी. ए. पाटील अध्यक्षस्थान भूषवणार आहेत. तरी जास्तीत जास्त विद्यार्थी, प्राध्यापकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन भगवान महावीर अध्यासन केंद्राच्या समन्वयक डॉ. पद्मजा पाटील यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 JAN 2017
लोकमत

## मराठी विभागातर्फे उद्या कार्यशाळा

कोल्हापूर : राज्य शासन आणि शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागातर्फे उद्या, गुरुवारी राज्यस्तरीय मराठी विकीपीडिया कार्यशाळा आयोजित केली आहे. विद्यापीठात सकाळी साडेदहा ते दुपारी चार वेळेत कार्यशाळा होईल. त्यात विकीपीडिया या मुक्त ज्ञानकोशासाठी नोंद लेखन, संपादन आणि टिपण दाखल करण्यांबाबत मार्गदर्शन करण्यात येईल. यासाठी ज्येष्ठ अभ्यासक तारा भवाळकर, नितीन वाघ, सुबोध कुलकर्णी आणि सुशांत देवळेकर यांना निमंत्रित केले आहे, अशी माहिती मराठी विभागप्रमुख डॉ. राजन गवस यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 JAN 2017
पुढारी

# आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेसाठी विद्यापीठाचा संघ पात्र

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** मिदनापूर (पश्चिम बंगाल) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ फुटबॉल संघ पात्र ठरला आहे. भोपाळच्या बरकतुल्लाह विद्यापीठात ४ ते १३ जानेवारी या कालावधीत झालेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने तृतीय स्थान पटकाविले. कर्णधार अक्षय मेथे (शहाजी महाविद्यालय) याच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या या संघातील खेळाडू ऋषिकेश मेथे याला स्पर्धेतील सर्वाधिक गोल करणारा खेळाडू म्हणून गौरविण्यात आले. हा संघ मिदनापूर येथे दि. ८ ते १४ फेब्रुवारी या कालावधीत होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. आज प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे यांची संघाच्या खेळाडूंनी सदिच्छा भेट घेतली. डॉ. मोरे यांनी यावेळी राष्ट्रीय स्पर्धेतील उज्ज्वल कामगिरीसाठी संघाला शुभेच्छा दिल्या. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, क्रीडा अधिविभागप्रमुख पी.टी. गायकवाड, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर.व्ही. गुरव, संघ प्रशिक्षक अभिजित वणिरे, संघ व्यवस्थापक एन.आर. कांबळे यांच्यासह खेळाडू उपस्थित होते.